# जयसिंगपूरमधील वडार समाजातील स्त्रीयांची उच्चशिक्षणातील सद्यस्थिती.

**श्री. विजय रामचंद्र डोंगरे**, पीएच.डी संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

..........................................................................................

**प्रस्तावना.**

जयसिंगपूर हे महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्हातील एक सधन गाव म्हणून ओळखले जाते. हे गाव कोल्हापूर शहरापासून ३८ किलोमीटर अंतरावर आहे. या शहराचे नाव श्रीमंत छत्रपती शाहूमहाराज यांचे वडील राजा जयसिंग यांच्या नावावरून ठेवले आहे. या शहराच्या पूर्वेस कृष्णा नदी वाहते. जयसिंगपूर शहरहे तंबाखूसाठी प्रसिध्द आहे. ही तंबाखूची बाजारपेठ देशातील मोठया बाजारपेठां पैकी एक आहे. या बाजारपेठेतून देशभर तंबाखू आणि गुटखा मोठया प्रमाणात निर्यात केला जातो. जयसिंगपूर येथे शैक्षणिक सोयीसुविधा मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत. प्राथमिक शिक्षणापासून ते पदवीपदव्युत्तर तसेच मेडिकल आणि इंजिनिअरींग अशा अनेक शिक्षणसंस्था आहेत. या जयसिंगपूर शहराची एकूण लोकसंख्या ४८५१० इतकी असून त्यापैकी पुरूषाची संख्या २४२७३ आहे तर स्त्रीयांची संख्या २४२३७ इतकी आहे. त्याचप्रमाणे शहरातील साक्षरतेचे प्रमाण ८५.३८ टक्के इतके आहे. यापैकी पुरूष साक्षरतेचे प्रमाण ६०.६७ टक्केतर स्त्री साक्षरता प्रमाण ७६.८३ टक्के इतके आहे. ( संदर्भ : सेन्सेस ऑफ इंडिया. २०११ )

**अभ्यासाचीउद्दिष्टयेः**

१. जयसिंगपूर शहरातील वडार समाजाचा अभ्यास करणे.
२. जयसिंगपूर शहरातील वडार स्त्रीयांची उच्चशिक्षणाची स्थिती अभ्यासणे.

**शोधनिबंधाचीअभ्यास पध्दतीः**

प्रस्तृत शोध निबंध हा प्राथमिक आणि दुय्यम माहितीवर आधारीत असून प्राथमिक साधनसामग्रीमध्ये ५० महिलांची प्रत्यक्ष मुलाखत आणि निरीक्षण याचा समावेश आहे तर दुय्यम साधनसामग्रीमध्ये विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे आणि इंटरनेट इत्यादीचा आधार घेतला आहे.

**उच्चशिक्षण :**

उच्चशिक्षण म्हणजे व्यक्तिमत्व विकासाचा अंतिम टप्पा होय. शिक्षणाचा पायाभूत उद्देश जर आपण पाहिला तर तो म्हणजे यक्तीच्य सर्वागीण विकासाची सुरवात होते. ती प्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासून मात्र त्याला पूर्णत्व प्राप्त करून देण्यामध्ये सिंहाचा वाटा असतो तो म्हणजे उच्चशिक्षणाचा ! वरिष्ट महाविदयालये आणि विद्यापीठात दिल्याजाणाया शिक्षणाला उच्चशिक्षण असे म्हटले जाते. विद्यापीठ म्हणजे विदयार्थ्याच्या केवळ परिक्षा घेणारी व त्यांना प्रमाणप्रत्रे देणारी संस्था नसून समाजाच्या विकासासाठी कार्यक्षम मनुष्यबळ निर्माण करणे व त्यासाठी उच्चशिक्षणाद्वारे बुध्दीप्रामाण्यवादी, तत्वचिंतक, मानवतावादी, समाजशील व उच्चशिक्षित तरूण वर्ग तयार करण हे विदयापीठाचे कार्य आहे. त्याचबरोबर उच्चशिक्षणाची काही उद्दिष्टये आणि ध्येये आहेत ती खालीलप्रमाणे सांगण्यात आलेले आहे.

**उच्चशिक्षणाची उद्दिष्टये :**

१. समाजवादी समाजरचनेसाठी जबाबदार युवक तयार करणे.
२. साक्षरता प्रसार व प्रौढशिक्षणाचे कार्य करणे.
३. विदयापीठे विदयेची केंद्रे बनविणे.
४. समाजपरिवर्तन घडवून आणणे.
५. विज्ञाननिष्ठ समाज घडविणे.

**उच्चशिक्षणाची ध्येयेः**

१. मुल्यांचा विकास करणे.
२. नेतृत्वाचा विकास करणे.
३. बौध्दिक विकास करणे.
४. आंतरराष्ट्रीय सद्‌भावनेचा विकास साध्य करणे.
५. व्यक्तींच्या उपजत गुणांचा विकास करणे.

**वडार समाज :**

वडार समाज हा भटका विमुक्त म्हणून गणला जातो. हा समाज मूळचा ओरिसा मधील आहे. या समाजाला आपल्या उधरनिर्वाहासाठी गावोगावी भटकंती करावी लागत असे मात्र अलीकडे काहीप्रमाणात ते जेथे रोजगार मिळेल त्याठिकाणी स्थायिक होवू लागला आहे. या समाजातील लोक दगडकाम, रस्ते बांधणे ,धरणे बांधणे, मातीकाम, खाणीतून दगड काढणे, जाते-उखळ,पाटे-वरवंटे अशा वस्तू बनविण्याचे व्यवसाय करतात. तसेच किल्ले राजवाडे, दगडी मंदिरे बांधणे, विहिर खोदणे, तलाव बांधणे इत्यादी कष्टाची आणि सर्जनशीलतेची कामे करतो. हा समाज जयसिंगपूर शहरामध्ये बांधकाम व्यवसायाच्या निमित्ताने तसेच आपल्या कौशल्य-श्रमाचा पुरवठा करण्यासाठी आलेला आहे. त्याचबरोबर शहरालगत खाणी निर्माण करू लागला त्यामुळे त्यांना जयसिंगपूर शहरामध्ये अधिक प्रमाणामध्ये रोजगार उपलब्ध झाला. या निमित्ताने शहरामध्ये वास्तव केल्याचे दिसून येते. या समाजाची जयसिंगपूर येथील एकूण लोकसंख्या जवळपास ४५०० इतकी आहे. (संदर्भ :जयसिंगपूर शहरवडारसमाज अध्यक्ष.)


**वडार समाजातील महिलांची सद्यस्थिती :**

शिक्षण हे व्यक्तिमत्व विकासाचे व सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. जयसिंगपूर शहरामध्ये मोठयाप्रमाणात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध आहेत. तरी देखील याचा पूर्णपणे लाभ या जातीतील स्त्रीयांना घेता आला नाही याचे कारण म्हणजे आर्थिक मागासलेपणा त्याचबरोबर शिक्षणाबद्दलची आवड कुटूंबातीलव यक्तींना नसल्यामुळे शिवाय समाजामध्ये असलेली अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, जातपंचायत यासारख्या सामाजिक समस्यामुळे या समाजातील महिला अधिकाधिक उच्चशिक्षणापासून वंचित राहिलेल्या आहेत. हे स्पष्ट करणारी सांख्यिकीय माहिती पुढीलप्रमाणे...

**शैक्षणिकमाहितीदर्शविणारी सारणी**

| अ. क्र | **शिक्षण** | **महिलांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | प्राथमिकशिक्षण | १६ | ३८ |
| २. | माध्यमिक | १३ | २६ |
| ३. | उच्चमाध्यमिक | ०६ | १८ |
| ४. | पदवी | ०६ | १२ |
| ५. | पदव्युत्तर | ०३ | ०६ |
| | **एकूण** | **५०** | **१००** |

( संदर्भ : प्रत्यक्ष मुलाखतीवरून. )




वरील सारणीवरून वडार समाजातील स्त्रीयांच्या उच्चशिक्षणातील माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. मुलाखत घेतलेल्या एकूण महिलां पैकी ३८ महिला प्राथमिक शिक्षण घेतलेल्या आढळून आल्या. माध्यमिक आणि उच्चमाध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिलांची टक्केवारी अनुक्रमे २६ व १८ इतकी आहे.तर पदवी शिक्षण घेतलेल्या महिलांची टक्केवारी १२ इतकी असून पदव्युत्तर शिक्षण म्हणजेच उच्चशिक्षण घेतलेल्या महिलांची टक्केवारी ६ इतकी अल्प आहे.

यावरून असे म्हणता येईल की, एका बाजूला सरकारकडून मोफत शिक्षणाचा नारा दिला जातो, स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे असे सागितले जाते, निरनिराळया प्रकारच्या शैक्षणिक सुविधा पुरवल्या जातात मात्र वरील अभ्यासावरून अजून सुद्धा उच्चशिक्षणाबाबत म्हणावी तशी प्रगती झाली नसल्याचे दिसून येते.

**सारांश :**

जयसिंगपूर शहर हे एक जिल्हयातील सधनगाव म्हणून ओळखले जाते. येथे अनेक शिक्षणसंस्था कार्यरतअसून यामध्ये प्राथमिक शिक्षणापासून ते इंजिनिअरींग, मेडिकल कॉलेज आहेत. तरी सुद्धा या समाजातील महिलांना याचा लाभ घेता येत नाही. कारण या समाजामध्ये स्त्रीयांच्या शिक्षणाबाबत अजून म्हणावी तशी जनजागृती झालेली नाही. तसेच स्त्रीयांना समाजामध्ये दुय्यम वागणूक दिली जाते त्याचबरोबर आर्थिक मागासलेपणा, अनिष्ठ रूढी-परंपरा इत्यादी गोष्टीचा वाईट प्रभाव या महिलांच्या उच्चशिक्षणावर झाल्याचे आढळते.

**संदर्भः**

१. रामनाथ चव्हाण ( २००७ ) वडार समाज इतिहास आणि संस्कृती., स्वाभिमान प्रकाशन, शिवाजी चौक, एन-४. विडको औरंगाबाद.
२. सतीश पवार ( २००८ ) वडार समाज आणि संस्कृती. प्रकाशन, ओड्र सेवा संस्था, कोल्हापूर.
३. डॉ. सौ. सीमाचवरे ( २०१४ ) वडार संस्कृती आणि साहित्य प्रकाशक, गोदा प्रकाशन, अक्षर ४६ जयनगर, नवा उस्मानपुरा, औरंगाबाद-४३१००५.
४. प्रत्यक्ष मुलाखत-वडार समाज शहर अध्यक्ष, उपाध्यक्ष.
5- इंटरनेट & www.jaysingpur city.com